संयम ॲग्रो प्रोसेसिंग को-ऑप सोसायटी लि.,सावळवाडी, ता.मिरज, जि.सांगली या संस्थेस राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजने अंतर्गत शासकीय भागभांडवल (कोल्हे समिती) मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग
शासन निर्णय क्रमांक : प्रक्रिया-१११२/प्र.क्र.२१८/१-स
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दि. ०६ मार्च, २०१९.

वाचा:-

१) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: प्रक्रिया-११२००४/प्र.क्र. १६२(अ)/९-स, दि. १२.१०.२००७.
२) रा.स.वि.नि. नवी दिल्ली यांचे पत्र क्र.NCDC:३-२५/२०१२-FG/१०८/SA२००३४, दि. ०८.०६.२०१२
३) शासन निर्णय क्र. प्रक्रिया-११२०१४/प्र.क्र.४६/९-स, दि.०१.०७.२०१४
४) शासन निर्णय क्र. प्रक्रिया-१११२/प्र.क्र.१७९/९-स, दि.३१.०३.२०१८.
५) रा.स.वि.नि. नवी दिल्ली यांचे पत्र क्र.NCDC:३-२५/२०१२-FG/२७०, दि.१८.०१.२०१८
६) शासन निर्णय क्र. प्रक्रिया-१११२/प्र.क्र.१४०/९-स, दि.०७.०४.२०१५
७) वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक:- अर्थसं:-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८
८) पणन संचालक, पणन संचालनालय, पुणे यांचे पत्र दि. ०७.०५.२०१८

प्रस्तावना:-

संयम ॲग्रो प्रोसेसिंग को-ऑप सोसायटी लि.,सावळवाडी, ता.मिरज, जि.सांगली या संस्थेमार्फत गव्हापासून आटा, रवा, मैदा उत्पादीत करणारा प्रकल्प उभारण्यात येत असून, राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला योग्य भाव मिळावा म्हणून सहकारी संस्थांना १:९ या प्रमाणात शासकिय भागभांडवल देण्याबाबत मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने या प्रकल्पाची वित्तीय सहाय्यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास निगमाकडे शिफारस करण्यात आलेली होती. राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने त्यांच्या दि. ०८.०६.२०१२ च्या पत्रान्वये सदर प्रकल्पाच्या खालील आकृतीबंधानुसार किंमत रु.४३५.०० लाख इतके अर्थसहाय्य मंजूर केले आहे.

(रु. लाखात)

अ.क्र.	तपशिल	टक्केवारी	आर्थिक आकृतिबंध
१	रा.स.वि.नि. किंवा इतर वित्तीय संस्थेकडून कर्ज	६०%	२६१.००
२	रा.स.वि.नि. भागभांडवल	३०%	१३०.५०
३	राज्य शासनाचे भागभांडवल	०६%	२६.१०
४	संस्थेचे स्वभागभांडवल	०४%	१७.४०
	एकूण:-	**१००%**	**४३५.००**

सदर संस्थेस संदर्भ क्र.३ व ४ मधील शासन निर्णयान्वये रा.स.वि.नि. कर्ज रु.१५२.२३ लाख, रा.स.वि.नि. भागभांडवल रु.१३०.५० लाख, शासकिय भागभांडवल (कोल्हे समिती) रु.१३.०५ लाख असे एकूण रु.२९५.७८ लाख इतके अर्थसहाय्य वितरित करण्यात आलेले आहे. संस्थेस संदर्भाधीन क्र.४ मधील दि.३१.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेले शासकिय भागभांडवल (कोल्हे समिती) रु.१३.०५ लाख बीडीएस प्रणालीवर उद्भवलेल्या तांत्रिक अडचणीमुळे

पणन संचालनालयाकडून सदर संस्थेस वितरित झालेले नाही. तद्नुषंगाने, संस्थेस मंजूर करण्यात आलेले शासकिय भागभांडवल (कोल्हे समिती) रु.१३.०५ लाख चालू आर्थिक वर्षातील तरतूदीमधुन वितरित करण्याबाबत पणन संचालनालयाकडून संदर्भाधीन क्र.८ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर संस्थेस शासकिय भागभांडवलाची रक्कम वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

शासन निर्णय:-

या शासन निर्णयाद्वारे संयम ॲग्रो प्रोसेसिंग को-ऑप सोसायटी लि.,सावळवाडी, ता.मिरज, जि.सांगली या संस्थेस उपरोक्त आकृतीबंधात दर्शविण्यात आल्यानुसार **शासकीय भागभांडवल (कोल्हे समिती) (४४२५ ०७५९) या लेखाशिर्षाखाली रु.१३,०५,०००/- (रुपये तेरा लाख पाच हजार फक्त)** वितरित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

०२. सदर संस्थेस कर्जाच्या अटी व शर्ती राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या दि.०८.०६.२०१२ च्या मंजूरी आदेशाप्रमाणे व शासकिय भागभांडवलाच्या परतफेडीच्या अटी व शर्ती शासन निर्णय दि.१२.१०.२००७ च्या अटी व शर्तीनुसार लागू राहतील. तसेच संस्थेस सदर शासन निर्णयानुसार मंजूर झालेल्या रकमेएवढया किंमतीच्या संस्थेची मालमत्ता तारण ठेवण्याबाबतचे करारपत्र संस्थेकडून करुन घेणे आणि संस्थेस वितरीत करण्यात येत असलेल्या रक्कमेच्या २० टक्के इतक्या रक्कमेची संचालकाकडून वैयक्तिक मालमत्तेचा तारण गहाण लिहून घेणे बंधनकारक राहिल. त्याशिवाय सदर मंजूर अर्थसहाय्य वितरित करण्यात येऊ नये.

०३. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या उक्त रकमांचे आहरण करुन वरील परिच्छेद ०२ वरील अटींची पूर्तता करुन संयम ॲग्रो प्रोसेसिंग को-ऑप सोसायटी लि.,सावळवाडी, ता.मिरज, जि.सांगली या संस्थेला अर्थसहाय्य वितरित करण्याकरिता लेखाधिकारी, पणन संचालक कार्यालय, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या स्वतंत्र लेखाशीर्षाखालील रक्कम जिल्हा कोषागार अधिकार, पुणे येथून आहरित करुन संस्थेस वितरित करण्याची कार्यवाही आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी यांनी करावी. त्यास अनुसरुन राज्य शासनाचे भागभांडवल (कोल्हे समिती) (४४२५ ०७५९) या लेखाशिर्षाखाली रु.१३,०५,०००/- (रुपये तेरा लाख पाच हजार फक्त) इतक्या रकमेचे स्वतंत्र धनादेश ,

"संयम ॲग्रो प्रोसेसिंग को-ऑप सोसायटी लि.,सावळवाडी, ता.मिरज, जि.सांगली"

"SAYYAM AGRO PROCESSING CO-OP. SOCIETY LTD., SAWALWADI, TAL. MIRAJ, DISTRICT SANGLI."

च्या नांवाने वितरित करण्यात यावा.

०४. संयम ॲग्रो प्रोसेसिंग को-ऑप सोसायटी लि.,सावळवाडी, ता.मिरज, जि.सांगली या संस्थेस राज्य शासनाच्या भागभांडवलाच्या नेहमीच्या अटी व शर्ती (त्यात काही सुधारणा/बदल असल्यास त्यासह) बंधनकारक राहतील.

०५. वरीलप्रमाणे मंजूर केलेला खर्च,

क) राज्य शासनाचे भागभांडवल (कोल्हे कमिटी) (४४२५ ०७५९) या लेखाशिर्षाखाली रु.१३,०५,०००/- (रुपये तेरा लाख पाच हजार फक्त) चा खर्च **"मागणी क्र.व्ही-३,४४२५-सहकारावरील भांडवली खर्च, (००)(१०८) इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका, (०२) सहकारी संस्करण संस्था पंचवार्षिक योजनांतर्गत- योजना, राज्य योजनांतर्गत योजना (०२)(०८) कृषि प्रक्रिया संस्थांना भागभांडवली अंशदान (कोल्हे कमिटी) (राज्य योजना) (४४२५ ०७५९) ३२, अंशदाने"** या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

०६. सदरच्या रकमेचा विनियोग संस्था आवश्यक त्याच बाबींकरिता करीत आहे. याबाबतचे नियंत्रण पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ठेवावे व याबाबतचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करण्यात यावा. त्याचप्रमाणे पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांनी संस्थेच्या कामकाजावर आणि प्रकल्प उभारणीवर लक्ष ठेवणे बंधनकारक राहील. संस्थेच्या कामाच्या प्रगतीचा तिमाही अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांनी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावा. पणन संचालक यांनी सदर अहवाल राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली व क्षेत्रीय कार्यालय, पुणे यांना व शासनास न चुकता दर तीन महिन्यानंतर सादर करावा. जर या कामी संस्थेकडून कुचराई झाल्यास मंजूर अर्थसहाय्याची एकरक्कमी वसुली करण्याचे अधिकार शासनाकडे राहतील. संस्थेचा प्रकल्प विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत संस्थेने योग्य ती काळजी घ्यावी. संस्थेच्या संचालकांना/ पदाधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल.

०७. या प्रकल्प खर्चामध्ये वाढ झाल्यास सदर वाढीव किंमत संस्थेने स्वबळावर उभी करावयाची आहे. वाढीव प्रकल्प किंमतीमध्ये शासनाच्या कोणताही अर्थसहाय्याचा सहभाग असणार नाही, याची संस्थेने नोंद घ्यावी.

०८. राज्य शासनामार्फत संस्थेस दिल्या जाणा-या भाग-भांडवलाची परतफेड योग्य प्रकारे होण्याचे दृष्टीने संबंधित संस्थेची मालमत्ता व संचालक मंडळाच्या सदस्याची सदर हप्त्याच्या २०% रक्कमेची वैयक्तिक मालमत्ता संस्थेने शासनाकडे तारण ठेवणे बंधनकारक असून, त्याशिवाय संस्थेस मंजूर प्रकल्पांतर्गत अर्थसहाय्य वितरित करण्यात येऊ नये. या अटीची पूर्तता झाली किंवा नाही याची खात्री पणन संचालक यांनी केल्यानंतरच निधी वितरित करण्यात यावा.

०९. हे आदेश वित्त विभागाचे वाचा मधील क्रमांक ७ मध्ये उल्लेख केलेल्या शासन परिपत्रकाद्वारे प्रशासकीय विभागास दिलेल्या अधिकारानुसार तसेच नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२९७/१४३१, दि.२६.१२.२०१८ व वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.१०३/२०१९/व्यय-२, दि.०५.०२.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०३०७११२०३५८७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jaiprakash
Mansaramji Ambade

Digitally signed by Jaiprakash Mansaramji Ambade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Cooperative Marketing, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=9ce079d77649e3080d74540a4a9ae7f6502ac7e6273891f24ffda6ebea493dce,
serialNumber=d214bfebdf948d521ecc91e9cb1487d0cce508098bc2232154c36daba7635819, cn=Jaiprakash Mansaramji Ambade
Date: 2019.03.07 11:22:10 +05'30'

(ज.म. अंबादे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
३. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र राज्य
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य,
७. महालेखापाल-१ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
८. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
९. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
१०.महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
११.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१३.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१४.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६.कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (कार्या.१४३१) मंत्रालय, मुंबई.
१७.कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-२)/(अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई.
१८. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली.
१९.लेखाधिकारी, पणन संचालनालय, म.रा. पुणे-१.
२०.कार्यासन अधिकारी (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१.अध्यक्ष, संयम ॲग्रो प्रोसेसिंग को-ऑप सोसायटी लि.,सावळवाडी, ता.मिरज, जि.सांगली,
२२.निवडनस्ती (१-स).

****